# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४
फॅक्स : २२०२९३४८.
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahamjp.com

## परिपत्रक क्र.१५४

**विषय :** विविध ग्रामीण तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांचा प्रगती अहवाल सादर करण्याबाबत.

**संदर्भ :** या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.विषय वाटप-२००३/५६३/आ.१ दि.२०.४.२०१२.

संदर्भिय कार्यालयीन आदेशाव्दारे मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व सनियंत्रण कक्षांतर्गत कामांच्या कार्यभाराविषयी सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व सनियंत्रण कक्षाकडील कामांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत चालू आर्थिक वर्षातील योजनानिहाय आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व त्यासंबंधीचा गोषवारा.

२. चालू वर्षाच्या लघु कृती आराखड्यांतर्गत इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा सविस्तर योजनानिहाय आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व त्यासंबंधीचा गोषवारा.

३. MSNA, UIDSSMT, नगरोत्थान, महाराष्ट्र स्वर्ण महोत्सवी नागरी दलितवस्ती, इतर नागरी पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनेंतर्गत सविस्तर योजनानिहाय आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व त्यासंबंधीचा गोषवारा.

४. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शासनाकडे तत्वत: मान्यतेसाठी तसेच प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेल्या योजनांचा प्रगती अहवाल.

५. शासनाकडे सादर करण्यात आलेल्या नागरी नळ पाणी पुरवठा योजनांचा प्रगती अहवाल.

६. विविध स्तरावरील आढावा बैठकीच्या वेळी क्षेत्रिय कार्यालयांशी संपर्क/समन्वय साधून बैठकीसाठी लागणाऱ्या माहितीचे संकलन व विश्लेषण करुन बैठकीची माहिती अद्ययावत करणे.

35/

वर नमूद केलेल्या बाबी या अत्यंत महत्वाच्या असूनदेखील मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व सनियंत्रण कक्ष व क्षेत्रिय कार्यालये यांच्यामध्ये योग्य तो समन्व नसल्याकारणाने मंत्रालयीन स्तरावर होणाऱ्या विविध बैठकांसाठी आवश्यक असणारी माहिती अचूक व वेळेवर उपलब्ध होत नाही असे लक्षात आले आहे. या अनुषंगाने निर्देशित करण्यात येत आहे की, वरील माहिती सतत अद्ययावत ठेवून ज्या-ज्या वेळी सदस्य सचिवांना बैठकीसाठी किंवा अन्य कारणांसाठी या माहितीची आवश्यकता लागेल त्या-त्या वेळी मुख्य अभियंता (मध्यवर्ती नियोजन) यांनी ती कोणत्याही दिरंगाईशिवाय उपलब्ध करुन द्यावयाची आहे. अशा प्रकारची माहिती विहीत वेळेत तातडीने सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व सनियंत्रण कक्षाकडे फॅक्स, ईमेलव्दारे पाठवावी. यासाठी आवश्यक तो पाठपुरावा, सनियंत्रण तसेच प्राप्त करुन घेतलेल्या माहितीचे विश्लेषण व संकलन मुख्य अभियंता (मध्यवर्ती नियोजन) यांनी म.नि.सं. व स. कक्षाकडील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून करुन घ्यावी. तसेच मुख्य अभियंता (मध्यवर्ती नियोजन) यांनी या संदर्भात प्रगती अहवाल दर महिन्यात सदस्य सचिवांना अवलोकनार्थ सादर करावा.

(सोनिया सेठी)
सदस्य सचिव

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/१५४/ ९०१
दिनांक : ३० जानेवारी, २०१८

प्रत :

- मुख्य अभियंता (मध्यवर्ती नियोजन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- मुख्य अभियंता (नागरी व ग्रामीण), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- मुख्य अभियंता (जलव्यवस्थापन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- मुख्य अभियंता (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे
- मुख्य अभियंता (अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ (सर्व)
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन मंडळ (सर्व)